"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
**WEB SITE** : **http://www.nkgsbsangh.org**
**E-MAIL** : **nkgsbs@gmail.com**
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। अन्नं न निन्द्यात ।।

मूल्य रु. ५

| क्रमांक ४ | वर्ष : ३६ | जानेवारी-मार्च २०१५ |
|---|---|---|

**BOOK PACKET (PERIODICAL)**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## मुंबई मंच - ठाणे मंच : संयुक्त कार्यक्रम

मुंबई व ठाणे मंच यांनी गेल्या वर्षी संयुक्तपणे सादर केलेल्या 'धूमशान' या सांस्कृतिक कार्यक्रमास मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे यंदाही मे-जूनच्या दरम्यान एक सांस्कृतिक कार्यक्रम करण्याचा मानस आहे भारतीय सिनेसृष्टीने नुकतीच शंभरी ओलांडल्याने त्याच अनुषंगाने सदर कार्यक्रम सादर करण्यात येईल. या कार्यक्रमात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी पूर्वतयारीसाठी लवकरांत लवकर संपर्क साधावा.

**संपर्कासाठी अंतिम तारीख : १५ फेब्रुवारी २०१५**

**ग्रुप डान्स व जोडी डान्स यांना प्राधान्य (सोलो क्षमस्व)**

**अधिकृत घोषणा एप्रिलच्या अंकात**

**रसिका गायतोंडे - ९९६९७४४०१ मंजिरी कुलकर्णी - ९६६५०९८११७**

## ठाणे मंचतर्फे एक दिवसाची सहल

**दिनांक :** रविवार ११ जानेवारी **प्रस्थान :** माहीम, मुलुंड, ठाणे

**आकार :** रु. ४५० (आपल्या बँकेच्या नौपाडा शाखा, खाते १८१६ मध्ये भरण्याची सोय.)

**स्थळ :** माऊंट व्ह्यु रिसॉर्ट, वसई

| सुरेश पालेकर | मंजिरी कुलकर्णी | राजू बोरकर |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९६६५०९८११७ | ९८२०९१७८४१ |


।। कै. दत्तात्रय वै. पालेकर (पोटली दत्ता), अमृतवाडी
यांचे कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण ।।

**PRACHI FOODS & CATERING SERVICES**
**OF PRAKASH GUDE**

- All types of Delicious Food • Pickles & Papad
- Poojari Available for Devkritya & Dharmakritya
- Our Home Made Goan Speciality-Tikhase Phov / Churma
- Dry Fish - Suke Bangde, Mori & Sungta

A - 305, Best Swasadan, Liliya Nagar, Near Kamat Club,
Goregaon (West), Mumbai - 400 062. ( 9869423494/28744683 )

# संपादकीय

## समाजसेवानिधीचा विनियोग

मुखपत्रिकेच्या प्रत्येक अंकात संघाला व एज्युकेशन सोसायटीला मिळालेल्या देणग्यांची माहिती देण्यात येते. या रकमेचा विनियोग कसा होतो व गरजू व्यक्तींना किती साहाय्य मिळते त्याचा तपशील वार्षिक अहवालात दिला जातो. ही माहिती सर्व वाचकांनाही वेळोवेळी देणे गरजेचे आहे.

संघाला मिळणाऱ्या देणग्यांची रक्कम बँकांमध्ये मुदत ठेवींच्या रुपाने गुंतविण्यात येते, त्यावरील व्याज व इतर देणग्या हे त्या वर्षाचे उत्पन्न म्हणून गणले जाते व या उत्पन्नातून अल्प प्रशासकीय खर्च वजा जाता शिल्लक रकमेंतून लाभार्थींना साहाय्य दिले जाते. सध्या ४२(४४) कुटुंबांना अवलंबून असलेल्या व्यक्तीनुसार प्रत्येक कुटुंबाला मासिक सरासरी रु. ३३००(२५००) एवढे साहाय्य मिळते. त्याशिवाय २१(२०) ज्येष्ठ नागरिकांना मासिक रु. ३७००(२७००) एवढे साहाय्य मिळते. त्याशिवाय वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ गेल्या आर्थिक वर्षात कॅन्सर, हॉर्ट अशा प्रकारच्या व्याधिग्रस्तांना सुमारे ४.५(८) लाख रुपयांची मदत करण्यांत आली. कंसातील आकडे गेल्या वर्षीचे आहेत.

अलीकडे विवाहखर्च, विशेषत: मुलीकडील असल्यास, आवाक्याबाहेर जातो अशावेळी खर्चाचा पूर्ण बोजा उचलता येत नसला तरी ज्ञातीतर्फे मंगळसूत्राचे तरी प्रायोजन करावे म्हणून अशावेळी अर्जदारांना २५ हजार रुपये देण्याची तजवीज करण्यात येते. गेल्या वर्षी एका गरजूला हे साहाय्य देण्यात आले.

दिवसेंदिवस वाढणाऱ्या महागाईमुळे या साहाय्यात वाढ करणे आवश्यक असते. उदार ज्ञातिबांधवाकडून सतत मिळणाऱ्या देणग्यांमुळेच वेळोवेळी ही वाढ करणे शक्य होते.

**नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा**

द.ना.नाडकर्णी

**१ जानेवारी २०१५**

---

## हळदीकुंकू समारंभ - भगिनींस आमंत्रण

नेहमीचा मकरसंक्रांतीचा हळदीकुंकू समारंभ यंदा माहीम व ठाणे येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळांत वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य यावे ही विनंती

| | **माहीम** | **ठाणे** |
|---|---|---|
| **तारीख** | गुरुवार १५ जानेवारी २०१५ | सोमवार १९ जानेवारी २०१५ |
| **कार्यस्थळ** | माटुंगा मित्रमंडळ<br>एफ ४, कर्नाटक बिल्डिंग,<br>मोगल लेन, माहीम. | सौ. सुरेखा सुरेश पालेकर यांच्या निवासस्थानी<br>७ दीपदर्शन, सहयोग मंदीर रोड,<br>नौपाडा, ठाणे |
| **वेळ** | संध्याकाळी ५ ते ७ | संध्याकाळी ५ ते ८ |
| | **संघ कार्यकारिणीतर्फे**<br>किशोरी अ. वागळे<br>शोभा प्र. कामत | **सांस्कृतिक मंचतर्फे**<br>सुरेखा पालेकर<br>मंजिरी कुलकर्णी |

## विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना वार्षिक स्नेहसंमेलनात स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती शीला | व | श्री. नागेश (परेश) बाळकृष्ण बर्डे | – माहीम |
| श्रीमती शीला | व | डॉ. श्रीकांत काशिनाथ बोरकर | – दादर |
| श्रीमती शांता | व | श्री. मोहन दत्तात्रय बोरकर | – वांद्रे |
| श्रीमती अपर्णा | व | श्री. वामन दत्तात्रय बोरकर | – अंधेरी |
| श्रीमती विजयालक्ष्मी | व | श्री. वसंत गणपतराव गायतोंडे | – अंधेरी |
| श्रीमती लता | व | श्री. देवीदास देवराव कसबेकर | – पुणे |
| श्रीमती मंगला | व | श्री. अरुण भास्कर कसबेकर | – चर्चगेट |
| श्रीमती आशा | व | श्री. शशिकांत विनायक नाडकर्णी | – माहीम |
| श्रीमती शुभदा | व | श्री. लीलाधर सदाशिव सलगर | – प्रभादेवी |
| श्रीमती किशोरी | व | श्री. अजित विश्वनाथ वागळे | – माहीम |

## ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | |
|---|---|
| गीता विश्वनाथ आगशीकर | माहीम |
| शांता मोहन बोरकर | वांद्रे |
| अपर्णा वामन बोरकर | अंधेरी |
| मंगेश रंगराव देसाई | खार |
| अरविंद भालचंद्र दिवेकर | मुलुंड |
| कृष्ण(अशोक)विनायक गायतोंडे | पुणे |
| पुष्पा सुरेंद्र कामत | कलवा |
| निर्मला मनोहर मिटबंदर | ग्रँटरोड |
| अशोक काशिनाथ नाडकर्णी | गोरेगांव |
| पांडुरंग(आपा)गणपत नाडकर्णी | पुणे |
| सीमा सुरेश नाडकर्णी | ठाणे |
| काशिनाथ विष्णु पावशे | दादर |
| लता विठ्ठल पालेकर | वरळी |
| जयवंत भवानीशंकर पिकळे | कांदिवली |
| धैर्यशील रामकृष्ण पालेकर | अमेरिका |
| काशिनाथ शांताराम पालेकर | अंधेरी |
| किशोर वासुदेव सबनीस | सांताक्रुज |
| उल्हास वसंत तेलंग | वांद्रे |
| अरविंद कृष्ण वाघ | मुलुंड |
| दिलीप सत्येंद्रनाथ वागळे | अंधेरी |
| जगदीश गुणेश्वर वागळे | मालाड |
| दुर्गाबाई लक्ष्मीकांत वागळे | कारवार |
| किशोर शंकर वागळे | माहीम |
| यशवंत गोविंद वागळे | जोगेश्वरी |

# प्रकाशझोत

## 'टाईम' नियतकालिकेच्या २०१४ सालच्या २५ सर्वोत्तम संशोधकांमध्ये डॉ. नलिनी नाडकर्णी यांचा समावेश

मूळ अंकोला येथील डॉ. दिगंबर विठ्ठल नाडकर्णी, एफ. आर. सी.एस्. हे कर्नाटक राज्यांत डायरेक्टर ऑफ मेडिकल सर्व्हिसीस या वैद्यकीय क्षेत्रांतील अत्युच्च जागेवरुन निवृत्त झाले होते. विविध विषयांवरील त्यांची इंग्रजी वृत्तपत्रांतून २००० हून अधिक पत्रे छापून आलेली होती. त्यासाठी पत्रलेखक म्हणून ते सर्वांना परिचित होते. डॉक्टरांचे धाकटे बंधु डॉ. मोरेश्वर नाडकर्णी सुमारे पाऊणशे वर्षापूर्वी फार्मासी विषयात डॉक्टरेट मिळविण्यासाठी अमेरिकेत गेले होते व तेथेच स्थायिक झाले. त्यांची ९३ वर्षाची पत्नी गोल्डा अद्याप हयात आहे. डॉ. मोरेश्वर नाडकर्णी यांची साठ वर्षांची कन्या डॉ. नलिनी वन परिसंस्था तज्ज्ञ म्हणून अमेरिकेत प्रसिध्द आहेत. कोस्टा रिका येथील रेन फोरेस्टस यावर त्यांचे संशोधन जगन्मान्य आहे. एका सामाजिक संस्थेच्या साहाय्याने त्यांनी ऑरेगॉन येथे कैद्यासाठी 'ब्लू रुम' तयार केली आहे. एकांतवासांतील कैद्यांना फार लहान कोठडीत ठेवतात. त्यामुळे त्यांना मानसिक आजार जडतात. ब्लू रुममध्ये प्रोजेक्टरच्या मदतीने वाळवंट, धबधबे व निसर्गदृश्य यांचा आभास केला जातो. यामुळे कैद्यांना निसर्गाच्या सान्निध्यात असल्यासारखे वाटून त्यांचे मन प्रसन्न राहते.

त्यांच्या या कार्याबद्दल 'टाईम' या प्रख्यात नियतकालिकांने २०१४ सालच्या २५ सर्वोत्तम संशोधनामध्ये त्यांच्या योगदानाचा समावेश केला आहे.

## श्री प्रभाकर नाडकर्णी यांचा आणखी एक काव्यसंग्रह प्रकाशित 'आज माझ्या गाण्यात'

मूळ अगळी गांवचे श्री. प्रभाकर वामन नाडकर्णी व्यवसायाने औषध निर्मितीच्या क्षेत्रांतील तज्ज्ञ. निवृत्तीनंतर ते स्वांतसुखाय म्हणून ललितसाहित्य लेखनाकडे वळले. 'कोकम' (कोकणी, कन्नड, मराठी) शिवाय त्यांचा हिंदी व उर्दू साहित्याचाही अभ्यास दांडगा आहे. हिंदी भाषेतील कांही उत्तमोत्तम कथा व कादंबऱ्या त्यांनी कोंकणीमध्ये अनुवादित करुन प्रसिध्द केलेल्या आहेत. कोंकणी भाषेतील त्यांचे प्रकाशित काव्यसंग्रह म्हणजे 'शिशिरांतील शेंवते फुलां' 'गजलप्रभा' व 'वळेसर शेर शायरीचे' ही होत. त्यांना नुकतीच ८५ वर्षे पूर्ण झाली तरी त्यांचा उत्साह कायम आहे. अलीकडेच 'आज माझ्या गाण्यात' हा त्यांचा मराठीतला पहिला काव्यसंग्रह प्रसिध्द झाला. पुण्यांत ठिकठिकाणी ज्येष्ठ नागरिकांसाठी 'अथश्री' नावाच्या वसाहती आहेत. ते पाषाणच्या वसाहतीत राहतात. अथश्रीच्या हाऊस जर्नल मधून त्यांनी मराठीत कविता लिहायला सुरुवात केली.त्याच रचना आता काव्यसंग्रह रुपांत प्रकाशित झाल्या आहेत. यातील कविता काल्पनिक, वैचारिक, स्वानुभावावर आधारित, प्रासंगिक अशा स्वरुपाच्या आहेत. त्यांच्या कवितांना गोव्याच्या आणि कारवारच्या मातीचा गंध लाभला आहे. ('आज माझ्या गाण्यात' मूल्य रु. १००, प्रभाकर नाडकर्णी, पुणे, (०२०–२५७६२८१९)

# वार्षिक स्नेहसंमेलन

दर वर्षीप्रमाणे यंदाही भरलेले आपल्या ज्ञातिबांधवांचे स्नेहसंमेलन २३ नोव्हेंबर रोजी नेहमीप्रमाणे उत्साहाने पार पडले. डॉ. अंटोनिओ डिसिल्व्हा ट्रस्टचे सभागृह जवळजवळ पाचशे प्रेक्षकांनी तुडुंब भरलेले होते. प्रमुख पाहुणे म्हणून ई एन् टी तज्ज्ञ डॉ. सुहास पांडुरंग वाघ हे सपत्नीक उपस्थित होते. त्यांचा परिचय मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात दिलेलाच आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुजाता केणी यांनी उत्कृष्टपणे केले. ध्वनिमुद्रित स्वागत गीतानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. मुख्य कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी गतवर्षी निधन पावलेल्या ज्ञातिबांधवांच्या स्मृतीप्रीत्यर्थ स्तब्धता पाळून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

यानंतर ज्ञातीतर्फे प्रमुख पाहुण्यांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देण्यात आले. जोगेश्वरी येथील उदय कसबेकर यांची कन्या सौ. आरती जांबवडेकर हिने डॉ. सौ. माया वाघ यांचे ओटी भरुन स्वागत केले. संघाचे अध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी व एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री देवदास नाडकर्णी यांनी आपापल्या संस्थांच्या गेल्या वर्षीच्या ठळक घटनांचा आढावा घेतला.

प्रमुख पाहुणे डॉ. वाघ यांनी मराठी भाषेतून अतिशय रंजकपणे, खुमासदारपणे खुसखुशीत असे विनोदी किस्से सांगून प्रेक्षकांचे मनोरंजन केले. विशेष म्हणजे डॉक्टर या नात्याने आरोग्यासंबंधी आणि आहारासंबंधी काहीही उपदेश न करता ज्येष्ठ नागरिकांनी आनंदी, सुखी व समाधानाने आयुष्य जगावे हा सल्ला दिला. तसेच व्यायाम व समतोल आहार हीच निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली आहे, असा त्यांनी कानमंत्रही दिला. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांशी निगडीत अशी एक कविताही वाचून दाखविली. त्यांनी आपल्या वैद्यकीय क्षेत्रातले रुग्णांचे त्यांना आलेले अनुभव विनोदाची झालर लावून कथन केले. रुग्णांची मानसिकता कशी असते हे त्यांनी गंमतशीर उदाहरणे देऊन उपस्थितांच्या ज्ञानात भर घातली. आजच्या इंटरनेटच्या जमान्यात मुलांनी सतर्क रहावयास हवे. तसेच पालकांनी मुलांशी सुसंवाद साधून त्यांच्यावर चांगले संस्कार करुन त्यांना सुजाण, सुशिक्षित व यशस्वी नागरिक होण्यासाठी मार्गदर्शन करावे असा त्यांनी बहुमोल संदेश दिला. एज्युकेशन सोसायटीतर्फे श्री. दत्तात्रय नाडकर्णी यांच्या कार्याची देवदास नाडकर्णी यांनी ओळख करुन दिली. मुखपत्रिकेशी एकरुप असलेल्या 'डी एन्'चे त्यांनी कौतुक केले व त्यांना संस्थेचे सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत केल्याबद्दल त्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संघातर्फे डॉ. संगीता पिकळे यांच्या कार्याची शिरीष वाघ यांनी ओळख करुन दिली. असोसिएशन ऑफ मेडिकल कन्सल्टंटस या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या संस्थेच्या

अध्यक्षपदी त्यांची निवड झाली, त्यासाठी संघातर्फे त्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. नंतर ज्ञातीतील पाच विद्यार्थी ऋतुजा धुमे, (आंतरशालेय संस्कृत कथा कथन स्पर्धेमध्ये द्वितीय पारितोषिक), अनिकेत धीरेन वागळे (कारवारी कु. स्टीफन हॉकिंग म्हणून गेल्या अंकात परिचय) रिया चैतन्य नाडकर्णी (जिल्हा स्तरावर काराटेमध्ये कांस्यपदक) डॉ. प्रसाद उमेश कसबेकर (M. S. in General Surgery) व पंकजा नागेश पिंगे (ICSE मध्ये ९६.४३% गुण, गणितांत १००%) यांना एज्युकेशन सोसायटीतर्फे खास पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला.

मध्यन्तरानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे विवाहाची सुवर्णजयंती गाठण्याऱ्या दहा जोडप्यांचा व वयाचा अमृतमहोत्सव साजरा करणाऱ्या चोवीस ज्येष्ठ व्यक्तींचा स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यानंतर कवळें मठ संस्कृत पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना व गेल्या वर्षी परीक्षांमध्ये विशेष गुण मिळालेल्या हुशार विद्यार्थ्यांना डॉ. सौ. वाघ यांच्या हस्ते बक्षिसे देण्यांत आली. त्याचे निवेदन श्रीमती गीता संझगिरी यांनी केले.

विवाहाची सुवर्णजयंती गाठण्याऱ्या जोडप्यांतील सौभाग्यवतींना ओटी खण देताना आरती जांबवडेकर हिने पारंपरीक नऊवारी साडी परिधान करुन सोहळ्याची शोभा वाढविली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यात ठाणे मंचचे उत्साही कार्यकर्ते, तसेच राजू बोरकर इत्यादींनी विशेष हातभार लावला. मृदुला भांडारकर यांचे योगदान तर सर्वश्रुतच आहे. श्री. राजीव गायतोंडे यांच्या आभार प्रदर्शनाच्या भाषणाने व राष्ट्रगीताने या हृद्य सोहळ्याची सांगता झाली.

**सौ. विद्या (माधुरी) मोहन वागळे, माहीम**

## स्वप्न

एक स्वप्न होतं माझं, तुझ्यासोबत आयुष्य घालवायचं
तुझ्यासाठी कोणत्याही परिस्थितीला निडरपणे समोर जायचं

माझ्या सुखात तुला हसवायचं, अन् तुझ्या दुःखात मी रडायचं
तुझ्या ओठावरच्या एका हास्यासाठी काहीही करायचं

एक स्वप्न होतं माझं, तुझं मन जिंकायचं
एक स्वप्न होतं माझं, तुझ्यासोबत तुझ्या घरात राहायचं

त्या घराला आपलं घर बनवायचं, आपल्या घराला सजवायचं
घरातल्या प्रत्येक गोष्टीसोबत आपलं नातं जपायचं, घर फुलाप्रमाणे फुलवायचं

फक्त एक स्वप्न होतं माझं, तुझी अर्धांगिनी बनूनच जगायचं

**सौ. विद्या वागळे, माहीम**

शिवाजी पार्क येथील वनिता समाजाच्या हस्तलिखीत मासिकात
या कवितेला तिसरे पारितोषिक मिळाले होते.

## प्रतिक्रिया
## आठवणीतलं सरस्वती बाग, जोगेश्वरी

गेल्या मुखपत्रिकेतील आठवणीतलं घर 'सुंदर निवास' हा माझी मैत्रीण विद्या धुमे हिचा सुंदर लेख वाचला आणि माझ्याही मनात आठवणींचे मोहोळ उठले. त्यांतच भर म्हणजे तेथे नेहमी भरणारा 'कारवारी खाद्य मेळावा'! जोगेश्वरीतील सरस्वती बाग म्हणजे मिनी कारवार! कारवारहून मंगेशी तसे दूर पण इथे मात्र मंगेशाला अगदी शेजारी आणले आहे. गेली पाचसहा वर्षे सरस्वती बागेत कारवारी खाद्य मेळावा भरतोय. आपली वास्तु, आपली माती यांचे काही गुण असतात ते आपल्या नकळत आपल्यात उतरतात तसेच माणसाचेही काही चांगले गुण सुध्दा वास्तुला, मातीला आपलेसे वाटतात. त्यामुळे मला वाटते सरस्वती बागेतल्या सर्व आया बहिणींचा मायेचा, 'अपुरबायेचा गुण' या मातीत उतरला आहे. म्हणूनच मुंबई-मंचला कारवारी खाद्य मेळावा सोसायटीत भरवायची इच्छा झाली. भक्तालाच देवाला भेटायची ओढ असते असे नव्हे तर देवालाही आपल्या भक्ताना भेटायची तीव्र इच्छा असतेच. देव भावाचा भुकेला!

विद्या म्हणते ते अगदी खरं. काही गोष्टी विकत आणायच्या असतात हेच माहित नव्हते कारण कोणाच्याही बागा आपल्यासाठीच आहेत असेच वाटायचे. सगळी सोसायटीच जणू आपल्याच आत्या, मावशी, मामा, काका, ताई यांचीच आहे असे वाटायचे. या सर्वांचा प्रेमाबरोबर, वडीलकीचा धाकही वाटायचा. उन्हाळ्यात पापडाच्या सिझनमध्ये आयांबरोबर आम्ही मुलीही एकमेकांच्या घरी पापड सुकत घालायला जायचा. गेल्या गेल्या पापडाची लाटी आम्हाला प्रेमाने दिली जायची. मात्र पापड सुकत घालताना बायकांनी किती मेहनतीने लाटलेले पापड आम्हां मुलींच्या पोटात जायचे याला गणतीच नाही. आमचे 'लाटणे' वेगळ्या पध्दतीचे! खरं म्हणजे मोठया बायकांना माहित असायचे पण त्या कधीही ते दाखवून देत नसत. तसेच आमच्या मैत्रिणींच्या आयानाही आमच्या आवडी निवडी माहित असायच्या. त्यामुळे सकाळी शाळेत जाताना रेखाच्या आईने तिला म्हटलेले 'मीनलाक सांग घरां वतांना यो. तिसऱ्या वडे दवरल्यात' असं कानावर पडले तरी दिवसभर शाळेत लक्षच लागायचे नाही. सोसासटीतील सर्वच बायकांना स्वत:च्या घरातल्याबरोबरच दुसऱ्यांनाही पदार्थ चाखायला द्यायची हौस होती. नीनाच्या आईच्या झणझणीत मटण चिकनची चव अप्रुपाची. कारण त्यावेळी ९०% कारवारी कुटुंबात मटण चिकन खायची पध्दत नव्हती. घरातले वडीलधारे पुरुष अंधेरी मार्केटमध्ये ग्रुप्स करुन जात व कोळणींशी हुज्जत घालुन दुसऱ्यापेक्षा 'माका नुस्ते स्वस्त मेळ्ळे' या आनंदात ताजे मासे घेऊन घरी येत व घरकान्न आपला जीव ओतुन माशांचे विविध प्रकार बनवत असे.

वर्षभर संक्रांत, श्रावणातले व चैत्रातले हळदीकुंकू, फुलविड्याची पंचमी वगैरे सोहळे सोसायटीतल्या ठरलेल्या घरी साजरे होत असत. त्या प्रत्येक घरी शिवाय ज्यांच्या घरी गणपती यायचे त्या प्रत्येकाकडे आमची हजेरी असे. दिवाळीची पहाट मंगेशकाकाच्या, 'घनश्याम सुंदरा श्रीधरा' या भूपाळीने व्हायची. त्यावेळी फारसा कोणाकडे ग्रामोफोन नव्हता. पहाटेच्या शांत समयी फार दूरवर धून ऐकू यायची.

आजकाल सर्वप्रथम बातमी देणाऱ्या मिडीयाचे (Breaking News) फारच कौतुक होते. तेव्हा मात्र सोसायटीत कुठलीही खमंग मसालेदार बातमी लपुन रहात नसे. सोसायटीतल्या बायका पंचायतखोर म्हणून नांवाला पडलेल्या होत्या. पण मला वाटते 'पंचायत्या' रंगवून सांगणे ही सुध्दा एक कलाच आहे. हो की नाही? उच्चभ्रू समाजात यालाच Gossiping म्हणतात.

असो! कारवारी माणूस कारवारहून मुंबईत आला अाणि मुंबईहून अमेरिकेला गेला तरी त्याच्यातला मॉग, अपुरबाय, कुचिंद्रीपणा कधीही कमी होणार नाही. मातीचा गुण दुसरे काय.

**मीनल, जोगेश्वरी**


# Shailesh Gaitonde

**Account Consultancy**

Office : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai 400066.
**Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 98692 11055 • **Office Time :** 10.00 a.m. to 6.00 p.m.

**COMPUTERISED ACCOUNTS SERVICES**

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

# मायभूमीपासून दूर राहूनसुध्दा सकारात्मक जीवन कंठणारी नव्वदी ओलांडलेली विमल पुरुषोत्तम (धुंडा) कसबेकर

डॉ. धुंडा कसबेकर ही व्यक्ती माहित नसलेले कारवारकर बांधव (विशेषत: गिरगांवकर) विरळा. ते एवढे लोकप्रिय की अनेक गिरगांवकर मंडळी नंतर दादर माहीम भागांत स्थायिक झाल्यावरसुध्दां त्यांच्याकडूनच औषधोपचार घेत असत व प्रसंगी (Visit) लाही बोलवत असत. त्यांच्या देखण्या पत्नी विमल, जिला तिची मुलं लाडाने 'चिची' अशी हाक मारतात त्या 'चिची'ची ही कहाणी.

तर ही चिची अमेरिकेत कोलंबस इथे बरीच वर्षे आपली कन्या डॉ. वीणा हिच्यासह स्थायिक झालेली आहे. सध्या प्रवृत्ती अस्वास्थ्यामुळे ती नर्सिंग होममध्ये राहते.

या ३ जानेवारी रोजी चिचीचा ९२ वा वाढदिवस. या उतारवयात चिची नर्सिंग होममध्ये राहूनसुध्दां अगदी सुशेगाद आहे. तिची मुलं, भाचरं, नातवंडं, अमेरिकेतून अगदी लंडनहून सुध्दा येऊन तिची विचारपूस करतात. त्यातच ती अगदी खुश व प्रसन्न असते. कधीही वृध्दत्त्वाची तक्रार नाही. ह्या वयांतही तिचं इंग्रजी आणि मराठी वाचन अखंड चालू आहे. ती स्वत: इंग्लीश विषयांतील पदवीधर आहे. वीणासुध्दा इंग्लीशमधील डॉक्टरेट असून तेथील विद्यापीठात प्रोफेसर आहे. चिची सगळ्या बाबतीत रस घेते. कुठल्याही विषयावर ती खणखणीतपणे चर्चा करु शकते. साईबाबा व श्रीशांतादुर्गा यांच्यावर अपार भक्ती. त्यामुळे सतत साईपुराण व शांतादुर्गा स्तोत्रांचं पठण व मनन चालू असतं. चिचीच्या कोलंबस या गावातच राहणारा माझा धाकटा भाऊ जयंत (बाळू) नाडकर्णी हा मुखपत्रिका कधी आणून देतो त्याची ती वाट बघत असते. गंमत सांगायची म्हणजे 'बिंगो' हा खेळही खेळते आणि सर्टिफिकेट मिळविते. इंग्लीश, मराठी व कोकणी अस्खलित बोलते पण कोंकणी बोलणारं कोणी भेटलं की एकदम खुश.

जयंत व त्याची पत्नी सौ. सुरेखा आवर्जून चिचीला भेटायला नेहमी जात असतात. जाताना पातोळी, तवसळीसारखे अस्सल कारवारी पदार्थ व 'मुखपत्रिका', 'वारसा कारवारचा' वगैरे घेऊन जातात.

जरा विषयांतर करते. माझा भाऊ जयंत याला कारवार व कारवारकर याबद्दल एवढं प्रेम (पिर्शॉ) की सुरेखा चेष्टेने त्याला म्हणते की कोणी किरिस्तांव वा मुसलमान असलातरी कारवारचा म्हटला की हा आवर्जून त्यांना फोन करणार, घरी बोलावणार, त्यांच्या घरच्या लग्नाला हजेरी लावणार. एकदां त्याचा जीवश्च कंठश्च बालमित्र उदय तेलंग कारवारच्या

आपल्या घरातून जयंतशी फोनवर बोलत होता. तेव्हां जयंतने फोनवर कोंबडयांचें आरवणं ऐकलं. ते ऐकून तो एवढा excite झाला की केवळ कारवारच्या कोंबडयाचं आरवणं ऐकलं हे सांगण्यासाठी त्याने मला भारतात ताबडतोब फोन केला! असो.

तर ह्या चिचीकडे अलीकडे दिवाळीला जयंत व सुरेखा दिवाळी फराळ व मुगाची आमटी घेऊन गेली होती. चिचीने सर्व कांही मनापासून खाल्लं.

अशी ही चिची अशीच आनंदात राहो व शंभरी पूर्ण करो अशी शांतादुर्गाचरणी प्रार्थना.

**सौ. शीला बर्डे, माहीम**
**(२४४५ ६७१९)**

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| नीलेश संतोष बोरकर, कारवार | व | स्वप्ना राधाकृष्ण बोरकर, मुंबई |
| संयुक्ता महेश (राजू) देसाई, अमेरिका | व | अरुण गुरुनाथन, अमेरिका |
| आदित्य मोहन मुझुमदार, सांताक्रुज | व | जेनीफर पॅलेय, अमेरिका |
| अनुष्का सुबोध नाडकर्णी, सिंगापूर | व | प्रणव अरविंद मेहन, चंदीगड |
| सारंग (शांतेश) प्रमोद नाडकर्णी, अंधरी | व | शीतल राजाराम बोंगाळे, सांताक्रुज |
| नकुल महारुद्र पालेकर, ग्रँटरोड | व | दीपाली प्रभाकर राणे, गांवदेवी |
| रेशम ब्रह्मेश संजगिरी, दादर | व | अमेय प्रसाद कानिटकर, अमेरिका |
| अमोघ गिरीश संजगिरी, शिवाजी पार्क | व | गौरी विकास परांजपे, नाना चौक |
| गौरीश दुर्गादास स्थळेकर, अंधेरी | व | सुमेधा शशीकुमार वाकडे, कांदिवली |
| सुवर्णा गिरीश वाघ, अंधेरी | व | दुर्गेश साईनाथ मातवणकर, गोरेगांव |
| रोहन दिलीप वागळे, ग्रॅंट रोड | व | प्रिया कृष्ण शेणॉय, मुलुंड |


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**
**Genuine India & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.), Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

# आमगेले कारवार

कारवार गांव तसो ल्हान
जाल्यार ताजी कीर्ती महान।।
गांव दिश्च्याक अती सुंदर
जगांतले उत्कृष्ट अशे हे बंदर।।
गांव वसला काळी नदी आणि अरबी समुद्राच्या संगमाचेर
पळवच्याक दिसता जणूं स्वर्ग देंवला धरतीचेर।।
हांगची शुभ्र वेळ आणि उंच डोंगर
अप्रतीम निसर्ग सौंदर्याचे जणूं आगर।।
नदीच्या एका तीरार सदाशिवगड कणसगिरी
दुसऱ्या तीरार कोडीबाग सुंकेरी।।
हांगचो व्यवसाय मासळी आणि शेती
म्हण्ण हांगा मेळता सुख आणि शांती।।
हांगा पिकता तांदुळ नाल्ल आणि सुपारी
आवडीचे खाणॉ नाल्ला चटणी आणि तांदळा भाकरी।।
बाराय म्हयने हांगा दिवाळी
सकाळ सांज तरतरेची मासळी।।
रोदूचे ताल्ले नगली एकशिपी आणि बांगडे
तशेंच एरप्पे, हीट, पातोळी आणि सुकरुंडे।।
काळो इश्यार्ड, फर्नाद आणि मुसराद
विसरच्याक जायना हांगच्या आंब्याचॉ स्वाद।।
हांगचे लोक आसात् तकलेन हुषार
पुण गांव सोण्ण कित्याक जातात पश्यार।।

- संगीता शिरीष वाघ, बोरीवली
(२८३३०८७०)

# विस्मरणांतील अस्सल कोंकणी शब्द

आपल्या कारवारकरांचे मूळ माजाळी, अवर्सा इत्यादी गांवातून मुंबई पुण्यांत आणि आता विलायतेत जवळजवळ पूर्णपणे स्थलांतर झालेले आहे. त्यामुळे आपली मूळ शुध्द कोकणी भाषा व त्यातील शब्द हळुहळु लोप पावत चालली आहे. बऱ्याच कोंकणी शब्दांची जागा आता मराठी शब्दांनी घेतलेली आहे. एवढेच नव्हे तर ती इंग्रजाळलेली आहे. माझे पप्पा श्री. विश्वनाथ गोविंद फेणे यांचे बालपण अंकोला, भटकळ, कुमठा, कारवार इथे गेले. त्यामुळे त्यांच्या भाषेंत अस्सल कोंकणी शब्द येतात. ते बोलताना कधीकधी कोंकणी म्हणींचाही वापर करतात. त्यांचे कांही अस्सल कोंकणी शब्द इतिहासजमा होण्यापूर्वी समानार्थी शब्दांसह खाली देत आहे.

| | |
|---|---|
| उंबळच्याक | : धुवायला |
| किमसा | : मच्छर |
| खेते | : माकड |
| चायमूय | : पातळ खरवस |
| ताते | : अंडे |
| दीवड | : साप |
| दुडु | : पैसे |
| पिरडुक | : काळे मणी |
| बॅबॉ | : बेडूक |
| माणाय | : पाट |
| रुख | : झाड |
| वजॅ | : जडसामान |
| सान्न | : झाडू |
| हून | : गरम |
| अमास | : अमावास्या |
| कॉयर | : कचरा |
| चिरी | : पिशवी |
| चान्ने | : चांदणे |

| | |
|---|---|
| देंवचे | : उतरणे |
| दीबण | : लग्नाची वरात |
| पोस | : खरवस |
| मेस्त | : सुतार |
| मॅणाय | : विरजण |
| रीण | : कर्ज |
| वंय | : कुंपण |
| सान | : लहान |
| हूम | : घाम |
| कोबू | : उस |
| काळिंगण | : कलिंगड |
| चॉबो | : टोपली |
| जाळेर | : डांस |
| तॉल्कल | : ? |
| दिम्बी | : गुडघा |
| निबर | : कमी शिजलेला |
| फाती | : वेणी |

| | |
|---|---|
| मडवळ | : धोबी |
| मॅट | : पायरी |
| वज्र | : हिरा |
| ससार | : सोपे |
| सैंत | : शेंबुड |
| होनी | : वहिनी |
| कॉकस्तान | : फार दूर |
| कूड | : खोली |
| चिटमिटकी | : गवार |
| जॉते | : वहाण |
| तग्गु | : खाली |
| दुवादस | : द्वादशी |
| पोन्ने | : जुने |
| फॉंड | : खड्डा |
| मांद्री | : चटई |
| मडे | : प्रेत |
| विंदूर | : उंदीर |
| सारे | : खत |
| संवगा | : सोंगे |

**मेधा विश्वनाथ फेणे, सांताक्रुज**
२६६८४४०१


www.kccgoa.in
वीण विश्वासाची, सोबत निसर्गाच्या कुशीची
कुणाल कन्स्ट्रक्शन म्हणजे उत्तम बांधकाम, कल्पक वास्तुशास्त्र आणि सर्वोत्तम सुविधांची विश्वासार्हता.
विश्वासाच्या याच विणीतून साकारलेल्या गोव्यातील 'सुखसमृद्धी' संकूलात आजच तुमची वास्तू पक्की करा आणि मग अनुभवा निसर्गाच्या कुशीत नटलेलं तुमचं समृद्ध संपन्न आयुष्य.
प्रदूषणविरहीत अशा वातावरणात राहून तुम्हाला अधिक संपन्न असं मानसिक आणि शारीरिक दीर्घायुष्य अनुभवता येईल यात काही शंकाच नाही.
सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर दीर्घायुष्याचं वरदान ठरेल हे नक्कीच.
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर, मंगेशी, फोंडा- गोवा
देखणा निसर्ग | प्रदूषणमुक्त हवा | उत्कृष्ट बांधकाम | मुबलक पाणीपुरवठा
मंगेशीचा मंगेश, म्हार्दोळची म्हाळसा वेलिंगचा नृसिंह, माडकईची नवदुर्गा अशा अतिशय प्रसिद्ध मंदिरांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर.
फ्लॅटस् उपलब्ध: 1 रुम किचन, 1 बी.एच.के, 2 बी.एच.के
प्रोजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था
a Project by: KCC कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:2683 3841/47/ 72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in
गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

## श्रीमती शैलजा व श्री गोपीनाथ तेलंग यांच्या स्मरणार्थ दोन लाख दहा हजार रुपयांची देणगी

मूळ केरवडी येथील श्री. गोपीनाथ मर्तोबा तेलंग यांनी सुमारे २५ वर्षापूर्वी आपल्या संघाचे खजिनदार म्हणून निष्ठेने काम केले होते. त्यांचे धाकटे बंधु प्रो. मंगेश तेलंग यांनीही सलग २५ वर्षे आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीचे सभासद म्हणून काम केलेले आहे. त्यांतील सहा वर्षे ते उपाध्यक्ष होते. श्री. गोपीनाथ तेलंग यांचे १९९७ साली निधन झाले. श्री. गोपीनाथ व त्यांच्या पत्नी श्रीमती शैलजा यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचे बंधू सर्वश्री गोविंद, मंगेश, उमेश व मधुकर तेलंग यांनी अलीकडील दोन लाख दहा हजार रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यातील एक लाख पांच हजार रुपये संघाच्या समाज सेवा निधीसाठी आहेत व ऊर्वरित एक लाख पाच हजार रुपये एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

## श्री शरद सलगर यांच्या स्मरणार्थ १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी

सदाशिवगड शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव म्हणजे दिवंगत शरद सलगर. २०१० साली ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनांत त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यांत आले होते. त्यावेळी मुखपत्रिकेच्या अंकात त्यांच्या टान्झानिया येथील ३५ वर्षाच्या यशस्वी वाटचालीबद्दल माहिती दिली होती. त्यांचे २०१२ साली निधन झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर यांनी पतीच्या स्मरणार्थ समाजसेवा निधीसाठी, वृध्दसेवा निधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी ५१ हजार याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी दिलेली आहे. गेल्या वर्षीही यांनी अशीच १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी दिली होती.

## श्रीमती इंदुमती कसबेकर यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी पुत्र श्री अरुण व सौ. मंगला यांच्यातर्फे एक लाख पाच रुपयांची देणगी

आपल्या संघाचे एक हितचिंतक श्री. अरुण भास्कर कसबेकर विविधप्रसंगी आप्तेष्टांच्या स्मृतीप्रीत्यर्थ नेहमी भरघोस देणग्या देन असतात हे आता सर्वांना ठाऊक आहे. ९ नोव्हेंबर २०१४ रोजी यांच्या परमपूज्य मातोश्री श्रीमती इंदुमती भा. कसबेकर यांची जन्मशताब्दी. त्याप्रसंगी श्री. अरुण कसबेकर व पत्नी सौ. मंगला (प्रभा) यांनी आईच्या स्मृतीप्रीत्यर्थ संघाच्या वृध्द सेवानिधीसाठी एक लाख पाच रुपयांची देणगी दिलेली आहे.

श्री. कसबेकर यांनी संघाला आतांपर्यंत सतरा प्रसंगी देणग्या दिलेल्या आहेत व या सर्व देणग्यांची रक्कम ३१ लाख रुपयांहून अधिक आहे.

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

## श्रीमती शैलजा व श्री गोपीनाथ तेलंग यांच्या स्मरणार्थ दोन लाख दहा हजार रुपयांची देणगी

मूळ केरवडी येथील श्री. गोपीनाथ मर्तोबा तेलंग यांनी सुमारे २५ वर्षापूर्वी आपल्या संघाचे खजिनदार म्हणून निष्ठेने काम केले होते. त्यांचे धाकटे बंधु प्रो. मंगेश तेलंग यांनीही सलग २५ वर्षे आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीचे सभासद म्हणून काम केलेले आहे. त्यांतील सहा वर्षे ते उपाध्यक्ष होते. श्री. गोपीनाथ तेलंग यांचे १९९७ साली निधन झाले. श्री. गोपीनाथ व त्यांच्या पत्नी श्रीमती शैलजा यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचे बंधू सर्वश्री गोविंद, मंगेश, उमेश व मधुकर तेलंग यांनी अलीकडील दोन लाख दहा हजार रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यातील एक लाख पांच हजार रुपये संघाच्या समाज सेवा निधीसाठी आहेत व ऊर्वरित एक लाख पाच हजार रुपये एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

## श्री शरद सलगर यांच्या स्मरणार्थ १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी

सदाशिवगड शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव म्हणजे दिवंगत शरद सलगर. २०१० साली ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनांत त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यांत आले होते. त्यावेळी मुखपत्रिकेच्या अंकात त्यांच्या टान्झानिया येथील ३५ वर्षाच्या यशस्वी वाटचालीबद्दल माहिती दिली होती. त्यांचे २०१२ साली निधन झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर यांनी पतीच्या स्मरणार्थ समाजसेवा निधीसाठी, वृध्दसेवा निधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी ५१ हजार याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी दिलेली आहे. गेल्या वर्षीही यांनी अशीच १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी दिली होती.

## श्रीमती इंदुमती कसबेकर यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी पुत्र श्री अरुण व सौ. मंगला यांच्यातर्फे एक लाख पाच रुपयांची देणगी

आपल्या संघाचे एक हितचिंतक श्री. अरुण भास्कर कसबेकर विविधप्रसंगी आप्तेष्टांच्या स्मृतीप्रीत्यर्थ नेहमी भरघोस देणग्या देन असतात हे आता सर्वांना ठाऊक आहे. ९ नोव्हेंबर २०१४ रोजी यांच्या परमपूज्य मातोश्री श्रीमती इंदुमती भा. कसबेकर यांची जन्मशताब्दी. त्याप्रसंगी श्री. अरुण कसबेकर व पत्नी सौ. मंगला (प्रभा) यांनी आईच्या स्मृतीप्रीत्यर्थ संघाच्या वृध्द सेवानिधीसाठी एक लाख पाच रुपयांची देणगी दिलेली आहे.

श्री. कसबेकर यांनी संघाला आतांपर्यंत सतरा प्रसंगी देणग्या दिलेल्या आहेत व या सर्व देणग्यांची रक्कम ३१ लाख रुपयांहून अधिक आहे.

## श्री. शंकर तेलंग यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी संघाला ५१ हजार रुपयांची देणगी

गेल्या पिढीतील कारवार येथील अत्यंत प्रतिष्ठित सामाजिक पुढारी रा. ब. गणपतराव तेलंग यांचे ज्येष्ठ पुत्र श्री. शंकर तेलंग ही केवळ एक व्यक्ती नसून एक सामाजिक मिनी संस्थाच होती. मेडिकल स्टोर्स (कारवारमधील पहिले) व वृत्तपत्र विक्री हा खरा त्यांचा व्यवसाय असला तरी प्रत्यक्षांत 'परोपकारी गंपू' सारखे इतरांच्या उपयोगी पडण्यांतच त्यांचा अर्धा वेळ व्यथीत होत असे. त्यांचे निवासस्थान म्हणजे एक धर्मशाळाच. कुणीही, कधीही, कितीही दूरच्या नात्यातला, कुठल्याही कामासाठी दुसऱ्या गांवाहून कारवारला आला तर त्यांचे घर म्हणजे एक हक्काचे ठिकाण. या सत्कार्यात धर्मपत्नी सुनीती यांचाही संपूर्ण सहभाग. कारवार सोडून इतरत्र स्थायिक झालेले कारवारकर यांचे सातबारा, जन्मदाखला, स्कूल लिव्हींग सर्टीफिकेट, पेन्शन अशाप्रकारचे कुठलेही काम असो, त्यांचे संपर्क स्थान म्हणजे शंकर तेलंग, आणि हे साहाय्यही कसे तर अत्यंत निरलसपणे, कुठलीही अपेक्षा न ठेवता. ११.११.२०१४ हा त्यांचा जन्मशताब्दी दिन. त्या प्रसंगी त्यांची मुले सर्वश्री उदय, सुधीर, प्रदीप, शोभा रामाणी व मीरा प्रभुवेर्लेकर यांनी मिळून आईवडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ संघाच्या समाज सेवा निधीसाठी ५१ हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त कन्या श्रीमती विद्या व जामात श्री. मनोज गोविंद भांडारकर यांजकडून. | ७५,००० |
| २. | श्री. भिकोबा शेषगिरी मिटबंदर यांच्या स्मरणार्थ मेहुणे श्री. पांडुरंग गणपत बर्डे यांजकडून. | २५,००० |
| ३. | श्रीमती वीणा विनायक गायतोंडे यांजकडून | ३,००१ |
| ४. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या १८ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलाकडून | १,००१ |
| ५. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून | १,००१ |
| ६. | श्रीमती सुनीती व श्री. शंकर गणपतराव तेलंग यांच्या स्मरणार्थ, श्री. शंकर गणपतराव तेलंग यांच्या १०० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी पुत्र सर्वश्री उदय, सुधीर व प्रदीप व कन्या श्रीमती शोभा अरुण रामाणी व श्रीमती मीरा निशिथ प्रभुवेर्लेकर यांजकडून | ५१,००० |
| ७. | श्रीमती शुभदा व श्री. लीलाधर सदाशिव सलगर यांजकडून विवाहाच्या सुवर्णमहोत्सव प्रसंगी. | १,००१ |
| ८. | श्रीमती शैलजा व श्री. गोपीनाथ मर्तोबा तेलंग यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ बंधू सर्वश्री गोविंद, मंगेश, उमेश व मधुकर तेलंग यांजकडून | १,०५,००० |

| | | |
|---|---|---|
| ९. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| १०. | श्रीमती शीला व श्री. नागेश (परेश) बाळकृष्ण बर्डे यांच्या विवाहाच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगी. | ११,१११ |

## वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती मीरा व श्री. गोपाल सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथीनिमीत्त पुत्र सर्वश्री मिलिंद व निमीष यांजकडून. | ५,००१ |
| २. | श्री. मनोहर शंकर वागळे यांच्या १५ व्या पुण्यतिथीनिमीत्त पुत्र श्री. सतीश यांजकडून. | २,००१ |
| ३. | श्री. मारुति सुब्राय दिवेकर यांजकडून पत्नी श्रीमती शुभा व पुत्र डॉ. रामानंद यांच्या स्मरणार्थ. | १०,००० |
| ४. | श्री. वासुदेव अनंत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती आशा वासुदेव नाडकर्णी यांजकडून. | ५,००० |
| ५. | श्रीमती सविता वसंत कसबेकर यांच्या स्मरणार्थ पणतु श्री. श्रीहान संदीप कसबेकर यांजकडून | ५,००० |
| ६. | श्री. सदानंद दुर्गप्पा नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती उमा यांजकडून. | १०,००० |
| ७. | श्रीमती अनुराधा आनंद वर्टी यांजकडून वाढदिवसाच्या प्रसंगी | ५,००० |
| ८. | श्री. विजय (राजा) बाळकृष्ण नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. विवेक यांजकडून. | ५,००० |
| ९. | श्रीमती इंदुमती भास्कर कसबेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी पुत्र श्री. अरुण व स्नुषा मंगला (प्रभा) यांजकडून | १,००,००५ |
| १०. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या १८ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| २. | वागळेकडून | १५,००० |
| ३. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून. | १,००१ |
| ४. | श्रीमती सविता किशोर सबनीस व श्रीमती स्नेहलता (चंपू) व श्री. वासुदेव गजानन सबनीस यांच्या स्मरणार्थ सविता सबनीस फाउंडेशनकडून | २,५०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्रीमती शैलजा व श्री. गोपीनाथ मर्तोबा तेलंग यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ बंधू सर्वश्री गोविंद, मंगेश, उमेश व मधुकर तेलंग यांजकडून | | १,०५,००० |
| ६. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | | ५१,००० |

## शतसांवत्सरिक निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती बन्सी धनंजय जोशी (अमेरिका) यांजकडून | ११,७०७ |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती स्मिता प्रवीण पिकळे | कांदिवली | १,००१ |
| २. | श्री. गिरीश शंकर नाडकर्णी | अंधेरी | २,००२ |
| ३. | श्रीमती अपर्णा सदानंद देसाई | ठाणे | ५,००० |
| ४. | डॉ. सुहास गोविंद फेणे | बंगळूर | २,००० |
| ५. | श्री. अभय यशवंत तिरोडकर | नवी मुंबई | ५,००० |

## विजूले चुटकुले

घोव बायलेक : हांव मर्नापुढे तूं दुसरे लग्न कर्तले की ना?
बायल : हांव मगेली सान भैण शोभाकडेन रांवतले. पूंण हांव मर्नापुढे तुमी लग्न कर्तले?
घोव : ना. हांवबी शोभाकडेनच रांवतलो

टीचर : अरे मंगेशा, माका एक सांग, तूं कॉलेजात कित्याक येता?
मंगेश : विद्येखातर येता सर.
टीचर : मागीर तू क्लासांत न्हीद कित्याक काढता?
मंगेश : आज विद्या आयली ना सर.

टीचर : मंगेशा, तूं खरें उलय, ना जाल्यार हांव चड्डी काण्ण बडयतलों तुका
मंगेश : चूक मगेली. मागीर तुमी चड्डी कित्याक काढतात?

विजय सदानंद वागळे, ठाणे
(९२२१६०७५७७)

Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80


# Bank is now Authorized Dealer (AD 1) in Forex



## YOU CAN OPEN NRE / NRO ACCOUNT AT ANY BRANCH

**NKGSB Bank**

NKGSB Co-op. Bank Ltd

SINCE 1917

Regd. Office: Laxmi Sadan, 361 , V.P. Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Email: customercare@nkgsb-bank.com |Web: www.nkgsb-bank.com | Customer Care No.: 022 2860 2000


हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.